# ५० लाखांच्या खंडणी प्रकरणात छोटा राजनची पुतणी अटकेत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** बांधकाम व्यावसायिकाला धमकावून ५० लाखांची खंडणी मागितल्या प्रकरणी दाखल गुन्ह्यात गुंड छोटा राजनची पुतणी प्रियदर्शिनी निकाळजे हिला खंडणीविरोधी पथकाने अटक केली.

कात्रज भागातील एका बांधकाम व्यावसायिकाला धमकावून खंडणी मागितल्याप्रकरणी छोटा राजनची पुतणी प्रियदर्शिनी प्रकाश निकाळजे (वय ३६, रा. जांभुळकर चौक, वानवडी), साथीदार मंदार वाईकर, धीरज साबळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. बांधकाम व्यावसायिकाने तक्रार दिल्यानंतर लष्कर परिसरात सापळा लावून वाईकर आणि साबळे यांना पकडण्यात आले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर निकाळजे पसार झाली होती. पोलिसांकडून तिचा शोध घेण्यात येत होता.

निकाळजे वानवडी भागात येणार असल्याची माहिती खंडणीविरोधी पथकाने पकडले. पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे, सहायक निरीक्षक सुजाता शानमे, उपनिरीक्षक विजय झंझाड, श्रीकांत चव्हाण, सचिन अहिवळे, प्रदीप शितोळे, शैलेश सुर्वे, विनोद साळुंके, सुरेंद्र जगदाळे, राहुल उत्तरकर आदींनी ही कारवाई केली.

# संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा उद्या बंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पर्वती जलकेंद्र, रॉ वॉटर पंपिंग, वडगाव, लष्कर, एसएनडीटी-वारजे आणि नवीन होळकर पंपिंग स्टेशन येथे गुरुवारी (२० मे) विद्युत आणि पंपिंग तसेच स्थापत्यविषयक दुरुस्तीची अत्यावश्यक कामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (२१ मे) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून कळविण्यात आले आहे.

**पाणीपुरवठा बंद राहणारे भाग पुढीलप्रमाणे आहेत.**

**पर्वती जलकेंद्र-**

शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्य नगर, डेक्कन परिसर, शिवाजी रस्ता परिसर, स्वारगेट, पर्वती, मुकुंदनगर, सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, तळजाई, कात्रज, धनकवडी, कर्वे रस्ता ते एसएनडीटी परिसर, एरंडवणा, कोथरूड परिसर, डहाणूकर कॉलनी, कर्वेनगर, विधी महाविद्यालय रस्ता.

**वडगाव जलकेंद्र-**

हिंगणे, आनंदनगर, वडगाव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ परिसर, कोंढवा बुद्रुक

**चतु:शृंगी- एसएनडीटी, वारजे जलकेंद्र-**

पाषाण, औंध, खडकी, चतु:शृंगी परिसर, गोखलेनगर, रेंजहिल्स, बावधन, बाणेर, चांदणी चौक, रामबाग कॉलनी, डावी-उजवी भुसारी कॉलनी, एकलव्य कॉलेज परिसर, पुणे विद्यापीठ परिसर, वारजे माळवाडी, औंध-बावधन, सूस, सुतारवाडी आणि भूगांव रस्ता

**लष्कर जलकेंद्र-**

लष्कर भाग, पुणे स्टेशन परिसर, मुळा रस्ता, कोरेगाव पार्क, ताडीवाला रस्ता, रेसकोर्स परिसर, वानवडी, कोंढवा, हडपसर, मुंढवा, येरवडा परिसर, विश्रांतवाडी, नगर रस्ता, कल्याणीनगर, वडगावशेरी, चंदननगर, खराडी, गोंधळेनगर आणि सातववाडी

**नवीन होळकर पंपिंग-**

विद्यानगर, टिंगरेनगर, कळस, धानोरी, लोहगाव, विश्रांतवाडी, विमाननगर आणि नगर रस्ता.

# आमदार प्रताप सरनाईक यांच्या बंगल्यावर 'ईडी'चे तपास पथक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे / लोणावळा :** शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांच्या लोणावळ्यातील बंगल्यावर मंगळवारी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी)पथकाने चौकशी केली. अत्यंत गुप्तता राखण्यात आलेल्या या तपास प्रक्रियेत बंगल्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण पथकाने ताब्यात घेतले. तसेच काही कागदपत्रेही ताब्यात घेण्यात आली.

ही चौकशी सीबीआयने केली की ईडीने, याबाबत पोलिसांमध्ये रात्री उशिरापर्यंत संभ्रम होता. लोणावळा ग्रामीण पोलिसांना याबाबत काहीही माहिती नव्हती.

लोणावळ्यातील कुणेगाव परिसरात सरनाईक यांचा बंगला आहे. बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) प्रताप सरनाईक आणि त्यांच्या मुलाची चौकशी करण्यात आली होती. ईडीकडून सरनाईक यांना चौकशीसाठी बोलविण्यात आले होते.

मंगळवारी सकाळी सरनाईक यांच्या लोणावळ्यातील बंगल्यावर (फार्म हाऊस) ईडीचे चौकशी पथक धडकले. या पथकाने तेथे जमलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलणे टाळले.

दरम्यान, याबाबत सरनाईक यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.


## सेंचूरी एन्का लिमिटेड

सीआयएन : एल२४३०४पीएन१९६५पीएलसी१३९०७५
नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट नं.७२ व ७२ए, एमआयडीसी, भोसरी, पुणे-४११ ०२६.
टेलि.नं.: ०२०-६६१२७३०० * फॅक्स नं.: ०२०-२७१२०११३.
वेबसाईट : www.centuryenka.com * ईमेल : cel.investor@birlacentury.com

३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तीन महिन्यांच्या आणि वर्षाच्या लेखापरिक्षित वित्तिय निष्कर्षाचा सारांश (रु लाखात)

| अ. क्र. | तपशील | रोजी संपलेले तीन महिने | | रोजी संपलेले वर्ष | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३१ मार्च २१ | ३१ मार्च २० | ३१ मार्च २१ | ३१ मार्च २० |
| | | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १. | व्यवहारातील एकूण उत्पन्न | ४४,९२४ | ३५,९९६ | १,२४,४८२ | १,४६,५७१ |
| २. | कर आणि अपवादात्मक बाबीपूर्व निव्वळ नफा | ६,४३३ | २,८२९ | ९,९९४ | ८,६४५ |
| ३. | करपूर्व आणि अपवादात्मक बाबीपश्चात निव्वळ नफा | ६,४३३ | २,८२९ | ९,१७५ | ८,६४५ |
| ४. | कर आणि अपवादात्मक बाबीपश्चात निव्वळ नफा | ४,८५७ | २,१८८ | ७,०९२ | ९,५५३ |
| ५. | कालावधीतील एकूण समावेशक उत्पन्न (कालावधीतील (करोत्तर) नफा आणि अन्य समावेश उत्पन्न (करोत्तर अंतर्भूत असलेले | ४,८६३ | १,५६६ | ८,१६३ | ८,८३१ |
| ६. | भरणा केलेले सम भागभांडवल (प्रत्येकी रु. १०/- चे दर्शनी मूल्याचे) | २,१८५ | २,१८५ | २,१८५ | २,१८५ |
| ७. | प्रती भाग (प्रत्येकी रु. १०/- च्या) मिळकत - पायाभूत | २२.२३ | १०.०१ | ३२.४६ | ४३.७२ |
| | - सौम्यीकृत | २२.२३ | १०.०१ | ३२.४६ | ४३.७२ |

नोंदी :
१. लेखा परिक्षण समितीने वरील निष्कर्षांचे परिक्षण केले आहे व संचालक मंडळाकडे मंजुरीसाठी शिफारस केली आहे आणि १८ मे २०२१ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेत संचालक मडळाने ते संमत केले आहेत.
२. भारत सरकारने २० सप्टेंबर २०१९ रोजी करनिर्धारण विधि (दुरुस्ती) अध्यादेश २०१९ नुसार आयकर अधिनियम, १९६१ मध्ये नवीन कलम ११५बीएए अंतर्भूत केले जे त्यात विहित केलेल्या शर्तींच्या अनुपालनासापेक्ष कमी केलेल्या दराने आयकर प्रदान करण्याचा विकल्प कंपनीला देते. कंपनीने सप्टेंबर २०१९ मध्ये कराच्या कमी केलेल्या दराचा पर्याय स्वीकारला आणि त्यानुसार कर खर्चाची गणना केली. कंपनीने तिच्या स्थगित कर दायित्वाचीसुद्धा पुनर्मोजणी केली ज्याच्या परिणामी ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाचे दायित्व ३१२० लाख रुपयांनी घटले.
३. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षातील अपवादात्मक बाब ही भरुच प्लान्टमधील काही पॉलिस्टर स्पिनिंग मशीन्ससाठीची ८१९ लाख रुपयांची हानी तरतूद दर्शविते.
४. वरील उतारा म्हणजे सेबी [ लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स ], २०१५ च्या विनियम ३३ नुसार स्टॉक एक्स्चेंजिसकडे सादर केलेल्या तिमाही निष्कर्षांच्या सविस्तर रुपाचा सारांश आहे. तिमाही निष्कर्षांचे संपूर्ण रूप, स्टॉक एक्स्चेंज वेबसाईटवर (www.nseindia.com व www.bseindia.com) आणि कंपनीच्या वेबसाईटवर (www.centuryenka.com) उपलब्ध आहे.

संचालक मंडळासाठी व त्यांच्या वतीने
सुरेश सोदानी
(व्यवस्थापन संचालक)

स्थळ : पुणे
तारीख : १८ मे २०२१


# समुद्रात सोळा तास वादळाशी झुंज!

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** खवळलेला समुद्र, मिट्ट अंधार, घोंघावणारा वारा अशा भयावह परिस्थितीत तराफ्यांवरील कर्मचाऱ्यांनी तब्बल १६ तास लाटांशी झुंज दिली. शेवटच्या क्षणापर्यंत जगण्याची आशा सोडायची नाही, ही एकच गोष्ट ध्यानात ठेवून ते लाटांवर तरंगत होतो. नौदलामुळे जीव वाचला, अशा भावना पी ३०५ तराफ्यावरील कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्या.

तराफा (बार्ज) नांगरापासून तुटल्यावर सोमवारी पहाटे त्यांत पाणी भरू लागले. दुपारच्या सुमारास तराफा बुडू लागल्यावर अनेक कर्मचाऱ्यांनी जीवरक्षक जॅकेट घालून समुद्रात उड्या मारल्या. तराफा बुडण्यापूर्वी मदतीसाठी संदेश पाठवले होते. मात्र दुपारी वादळ मुंबईच्या दिशेने सरकले होते. त्याच्या प्रभावाने मोठ्या लाटा उसळत होत्या. सरासरी ताशी १०८ कि.मी. वेगाने वारे किनाऱ्यावर वाहात होते. तरफ्यावरील शेकडो कर्मचाऱ्यांनी

जीवरक्षक जॅकेट, तरंगताना मिळेत तो आधार घेऊन भर समुद्रात मृत्यूशी झुंज दिली.

आम्ही जीवरक्षक जॅकेट परिधान करून समुद्रात उड्या मारल्या. कोणीतरी वाचविण्यासाठी येईल या आशेवर तरफ्याच्या तिसऱ्या मजल्यावरून सुमारे ३० फुट उंचीवरून स्वतःला समुद्रात झोकून दिले. त्यामध्ये पायाला दुखापत झाली. रक्तबंबाळ पाय घेऊन १६ ते १७ तास पाण्यात तरंगत होतो. माझ्याबरोबर असलेले इतर भरकटत दूर गेले. रात्री जवळपास कोणी असण्याची आशाही दिसत नव्हती. त्यावेळी आपले जगणे अवघड आहे असेच वाटत होते. आई, तीन वर्षांची मुलगी आणि नऊ वर्षांच्या मुलाचा चेहरा डोळ्यासमोर तरळत होता. एकदाच त्यांना भेटता यावे ही इच्छा होती. सोसाट्याचा वारा आणि लाटांचा मारा सहन करत रात्रभर पाण्यात तरंगत होतो. पोटात अन्न नसताना केवळ कुटुंबियांच्या आठवणीने तग धरून होतो. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास नौदलाचे हॅलिकॉप्टर आल्यावर जीवात जीव आला. आणखी काही क्षण हॅलिकॉप्टर पोहचले नसते, तर मृत्यू निश्चित होता, अशी भावना मृत्यूच्या दाढेतून परतलेले सतीश नरवाल यांनी व्यक्त केली. मूळ हरियाणा येथील ३२ वर्षीय नरवाल हे गेल्या सात-आठ महिन्यांपासून तराफ्यावर काम करत होते.

पी ३०५ या तराफ्यावर मेकॅनिकचे काम करणारे संदीप कुमार हे मूळचे उत्तरप्रदेशातील रहिवासी आहेत. सोमवारी सायंकाळच्या सुमारास नौदलाची युद्धनौका पोहोचली. मात्र वारा जोराचा असल्याने युद्धनौका जवळ येईपर्यंत आम्ही दूर फेकले जात होतो. रात्रभर पाऊस सुरू होता. कसेतरी तग धरून होतो. नौदलाची युद्धनौका दिसत होती. मात्र तिच्यापर्यंत पोहोचता येत नव्हते, असे संदीप यांनी सांगितले.

गॅल कन्स्ट्रक्टर या तराफ्यावर अविनाश अडके हा तरूण अडकला होता. तो फायरमन म्हणून कार्यरत होता. चक्रीवादळामुळे तराफा नांगरापासून तुटून नियंत्रणाबाहेर गेला. मदतीसाठी जहाजे जवळ येत होती. मात्र खवळलेल्या समुद्रामुळे अडचणी येत होत्या. तराफ्यामध्ये पाणी भरत होते. मोटरद्वारे पाण्याचा उपसा चालू ठेवला होता. या वादळातून सुटका होणार नाही असेच वाटत होते. नौदल आणि तटरक्षक दलाशी मदतीसाठी सतत संपर्क साधत होतो. शेवटी मंगळवारी आम्हाला सुखरूप बाहेर काढण्यात आले, असे अविनाश याने सांगितले.


Mahatma Phule Renewable Energy and Infrastructure Technology Limited
MAHAPREIT (Subsidiary of MPBCDC, a Government of Maharashtra undertaking)

CORRIGENDUM

Refer the advertising of MAHAPREIT dtd 08/05/21.
Last date of application extended up to 24/05/21 with amended terms.
For details refer website
www.mahatmaphulecorporation.com


# संगीतकार अच्युत ठाकूर यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** संगीतकार अच्युत ठाकूर यांचे मंगळवारी करोनाने निधन झाले. वयाच्या ६९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. काही दिवसांपूर्वी त्यांना करोनाची लागण झाल्यामुळे मुंबईतील सेव्हन हिल्स रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते. त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने निधन झाले.

गेली ४०हून अधिक वर्षे ते संगीत क्षेत्रात कार्यरत होते.

वडिलांकडून केवळ दहा रुपये घेऊन गाणे शिकण्यासाठी ते मुंबईत आले. मुंबईत आल्यावर ते गांधर्व महाविद्यालयातून 'संगीत विशारद' झाले. या वाटेवर त्यांना अनेक दिग्गज गुरूंचे मार्गदर्शन मिळाले. १९८३ ला 'श्री रामायण' हा त्यांनी संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट. त्यानंतर 'पैज लग्नाची', 'घे भरारी', 'सत्ताधीश', 'गृहलक्ष्मी', 'सख्खा भाऊ पक्का वैरी', 'आता लग्नाला चला', 'सर्जा राजा', 'मर्मबंध', 'चिमणी पाखरं', 'तुझा दुरावा', 'विठाबाई' अशा अनेक चित्रपटांना त्यांनी संगीत दिले आहे. ४०हून अधिक चित्रपट तर २० हून अधिक नाटकांना संगीतबद्ध केले आहे. ३० वर्षांपूर्वी संगीतबद्ध केलेले 'जांभूळ आख्यान' आजही लोकप्रिय आहे. अनेक पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित करण्यात आले होते.


## KALYANI STEELS LIMITED

KALYANI
KALYANI STEELS
CIN : L27104MH1973PLC016350
Regd. Office : Mundhwa, Pune - 411 036 Phone : 020 66215000 Fax : 020 26821124
Website : www.kalyanisteels.com E-mail : investor@kalyanisteels.com

EXTRACT OF AUDITED FINANCIAL RESULTS
FOR THE QUARTER / YEAR ENDED MARCH 31, 2021
(₹ in Million)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Year Ended | | Quarter Ended | | | Year Ended | |
| | | March 31, 2021 | Dec. 31, 2020 | March 31, 2020 | March 31, 2021 | March 31, 2020 | March 31, 2021 | Dec 31, 2020 | March 31, 2020 | March 31, 2021 | March 31, 2020 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Audited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Audited |
| 1 | Total Income from operations | 3,890.96 | 3,769.27 | 2,793.13 | 12,305.29 | 12,221.91 | 3,891.44 | 3,769.28 | 2,793.14 | 12,308.38 | 12,221.96 |
| 2 | Profit for the period (before tax, Exceptional items) | 1,020.24 | 809.42 | 333.26 | 2,550.37 | 1,679.03 | 1,017.12 | 808.63 | 311.23 | 2,547.18 | 1,648.65 |
| 3 | Profit for the period before tax (after Exceptional items) | 1,020.24 | 809.42 | 333.26 | 2,550.37 | 1,679.03 | 1,017.12 | 808.63 | 311.23 | 2,547.18 | 1,648.65 |
| 4 | Profit for the period after tax (after Exceptional items) | 758.71 | 604.91 | 229.85 | 1,903.02 | 1,371.18 | 755.59 | 604.12 | 207.82 | 1,899.83 | 1,340.80 |
| 5 | Total Comprehensive Income after tax (comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)) | 754.42 | 606.28 | 120.11 | 1,902.84 | 1,259.91 | 751.30 | 605.49 | 98.08 | 1,899.65 | 1,229.53 |
| 6 | Equity Share Capital | 218.64 | 218.64 | 218.64 | 218.64 | 218.64 | 218.64 | 218.64 | 218.64 | 218.64 | 218.64 |
| 7 | Other Equity | | | | 11,323.51 | 9,420.67 | | | | 11,314.57 | 9,411.94 |
| 8 | Earnings Per Share : (of ₹ 5/- each) Basic and diluted (not annualised) | 17.39 | 13.85 | 5.27 | 43.59 | 31.41 | 17.34 | 13.85 | 5.19 | 43.59 | 31.29 |

Note :
The above is an extract of the detailed format of Quarterly / Yearly Financial Results filed with Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as modified by Circular No. CIR/CFD/FAC/62/2016 dated July 5, 2016. The full format of Quarterly / Yearly Financial results are available on the websites of Stock Exchanges at www.bseindia.com and www.nseindia.com and also on Company's website at www.kalyanisteels.com

For KALYANI STEELS LIMITED
R. K. Goyal
Managing Director

Date : May 18, 2021
Place : Pune



## KALYANI INVESTMENT COMPANY LIMITED

KALYANI
CIN : L65993PN2009PLC134196
Registered Office : Mundhwa, Pune - 411 036 Tel : 91 20 66215000, Fax : 91 20 26821124
Website : www.kalyani-investment.com E-mail : investor@kalyani-investment.com

EXTRACT OF AUDITED FINANCIAL RESULTS
FOR THE QUARTER / YEAR ENDED MARCH 31, 2021
(₹ in Million)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Year Ended | | Quarter Ended | | | Year Ended | |
| | | March 31, 2021 | Dec. 31, 2020 | March 31, 2020 | March 31, 2021 | March 31, 2020 | March 31, 2021 | Dec. 31, 2020 | March 31, 2020 | March 31, 2021 | March 31, 2020 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Audited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Audited |
| 1 | Total Income from operations | 58.29 | 19.79 | 190.78 | 126.04 | 483.32 | 19.62 | 19.79 | 152.11 | 79.64 | 421.45 |
| 2 | Profit for the period (before share of net profits of associate, Exceptional items, tax) | 45.12 | 12.73 | 162.04 | 92.92 | 429.89 | 6.45 | 12.73 | 123.37 | 46.52 | 368.02 |
| 3 | Profit for the period before tax (after Exceptional items) | 45.12 | 12.73 | 162.04 | 92.92 | 429.89 | 166.14 | 139.04 | 200.11 | 464.08 | 632.79 |
| 4 | Profit for the period after tax (after Exceptional items) | 36.08 | 11.39 | 158.03 | 77.95 | 426.17 | 123.43 | 102.56 | 47.41 | 345.85 | 480.38 |
| 5 | Total Comprehensive Income after tax (comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)) | 6,559.06 | 5,238.54 | (16,649.86) | 25,927.88 | (17,478.46) | 6,642.99 | 5,329.77 | (16,761.01) | 26,192.52 | (17,424.66) |
| 6 | Equity Share Capital | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 |
| 7 | Other Equity | | | | 44,893.63 | 18,965.75 | | | | 46,233.44 | 20,040.92 |
| 8 | Earnings Per Share : (of ₹ 10/- each) Basic and diluted (not annualised) | 8.27 | 2.61 | 36.20 | 17.86 | 97.63 | 28.28 | 23.50 | 10.86 | 79.23 | 110.05 |

Note :
The above is an extract of the detailed format of Quarterly / Yearly Financial results filed with Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 as modified by Circular No. CIR/CFD/FAC/62/2016 dated July 5, 2016. The full format of Quarterly / Yearly Financial results are available on the websites of Stock Exchanges at www.bseindia.com and www.nseindia.com and also on Company's website at www.kalyani-investment.com

For KALYANI INVESTMENT COMPANY LIMITED
Amit B. Kalyani
Chairman

Date : May 18, 2021
Place : Pune



लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

**भविष्यविषयक**

**ॲस्ट्रॉलॉजी:** गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा-चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ७, हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र - कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. २८८८९७०६/ ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)

0070739866-1

**नावात बदल**

My new name is Prathana Kaur Prabhkirat Singh Ghai . Old name Prathana Jagjit Singh Narang. Changed vide aadhar card number 4980 7119 0104.

0090285537-1

**स्थावर मालमत्ता?**
तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी 'लोकसत्ता'त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर (अँडकार्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा


# परमबीर सिंह यांची याचिका : सुनावणीतून न्या. गवई यांची माघार

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**मुंबईचे माजी** पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी त्यांच्या विरोधातील सर्व चौकशा महाराष्ट्राबाहेरील स्वतंत्र संस्थेकडे सोपवाव्यात, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली असून त्यावरील सुनावणीतून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश बी. आर. गवई यांनी माघार घेतली आहे. न्या. विनीत सरण व न्या. गवई यांच्या सुटीतील न्यायपीठापुढे ही याचिका सुनावणीसाठी आली होती.

न्या. गवई यांना या प्रकरणातील सुनावणी करण्यात काही अडचणी आहेत. आम्ही हे प्रकरण दुसऱ्या पीठापुढे सुनावणीसाठी ठेवू, असे न्या. विनीत सरण यांनी सांगितले. आपण या प्रकरणी सुनावणी करू शकत नाही, असे गवई यांनी सांगितले. हे प्रकरण दुसऱ्या न्यायपीठाकडे देण्यात यावे असे या वेळी सुचवण्यात आले.

परमबीर सिंह यांची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील पुनीत बाली यांनी सांगितले की, माजी पोलीस अधिकारी असलेल्या आमच्या अशिलांविरोधातील चौकशी हा सुडाचा भाग आहे. मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी वेळोवेळी

दिलेल्या आदेशांचे त्यात उल्लंघन झाले आहे. परमबीर सिंह हे १९८८ च्या तुकडीतील आयपीएस अधिकारी असून मुंबईच्या पोलीस आयुक्त पदावरून त्यांना १७ मार्च रोजी काढून टाकण्यात आले होते. नंतर त्यांना महाराष्ट्र राज्य गृहरक्षक दलाचे जनरल कमांडर पद देण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर भ्रष्टाचार व गैरवर्तनाचा आरोप केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने नंतर सिंह यांनी देशमुख यांच्या विरोधात केलेल्या आरोपांची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश दिले होते. यामुळे देशमुख यांनी मंत्रिपदाचा राजीनामाही दिला.

परमबीर सिंह यांनी नवीन याचिकेत असा आरोप केला, की राज्य सरकारने आपल्याविरोधात अनेक चौकशा सुरू केल्या आहेत. त्या सर्व महाराष्ट्राबाहेर सीबीआयसारख्या स्वतंत्र संस्थेकडे वर्ग कराव्यात.